सकाळ : शनिवार, ११ जानेवारी १९९२ / २

# स्वराज्य टिकविण्याचे काम महाराणी ताराराणींनी केले

## स. शं. देसाई यांचे प्रतिपादन

कोल्हापूर, ता. १० - छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य टिकविण्याचे काम महाराणी ताराराणीने केले. ताराराणी झाली नसती, तर हिंदुस्थानला भवितव्य राहिले नसते, असे प्रतिपादन स. शं. देसाई यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठ आणि कमला कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या भद्रकाली ताराराणी व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक-अध्यक्ष व्ही. टी. पाटील होते.

स्वातंत्र्य सौदामिनी महाराणी ताराबाई हा देसाई यांच्या व्याख्यानाचा विषय होता. ते म्हणाले, '२७ वर्षे चाललेले मराठ्यांचे युद्ध प्रचंड व प्रदीर्घ म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील इतिहासकार किंवा अन्य साहित्यिकांना त्याचा आवाका आला नाही. सैन्यात वास्तव्य करून आदेश देणारी ताराराणी युद्धाचे व सैन्याचे नेतृत्व चांगल्या तऱ्हेने करीत होती. त्यामुळेच तिने मोगल सम्राट व विशेषतः औरंगजेबास जेरीस आणले.'

महाराणी ताराराणीच्या नावे सैनिकी स्कूल स्थापण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावेत, असे आवाहन व्ही. टी. पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात केले. स्वागत व प्रास्ताविक कमला कॉलेजचे प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांनी केले.